बृहन्मुंबई महानगरपालिका

नअ/००१५१७/चौकशी दि. 3 MAY 2023

**विषयः- नगर अभियंता खात्यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) पदांच्या सुधारीत अर्हता.**

नगर अभियंता खात्यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) पदांच्या सुधारित अर्हतांना मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि. १८.०४.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/४३९२/डी अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सर्व खाते प्रमुख/ विभाग अधिकारी यांना कळविण्यात येते की, संबंधित कर्मचारी वर्गाकडून या सुधारित अर्हतांची नोंद करुन घेण्यासाठी हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रक आपल्या विभागीय कर्मचा-यांना प्रसृत करावे व ते ठळकपणे सूचना फलकावर लावून त्यास जास्तीत जास्त प्रसिध्दी दयावी.

नगर अभियंता (प्र)

प्रतः- ..............................................................यांना माहितीसाठी कृपया अग्रेषित.

सह प्रमुख कर्मचारी अधिकारी
नगर अभियंता

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि.१८.०४.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/४३९२/डी अन्वये मंजूरी दिलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाच्या सुधारीत अर्हता.**

**(एक) सरळसेवेने ( ८० टक्के पदे सरळसेवेने)**

बाहेरुन थेट सरळसेवेने जे उमेदवार खालीलप्रमाणे किमान पात्रता धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षापेक्षा व मागासवर्गीय उमेदवारांचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही. तसेच वयाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका/शासनाने वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

२) उमेदवाराने एस.एस.सी वा समकक्ष परीक्षेनंतर ३ वर्षाची स्थापत्य वा कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग मधील पदविका संपादित केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/ विद्यापिठामधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

(दोन) उपरोक्त अनु क्र.२ मध्ये नमूद अर्हतांशी समकक्ष अर्हता असल्यास उमेदवाराने खाजगी स्वायत्त महाविद्यालयातून प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

३)उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.
क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाचा वेळोवेळी संगणक हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.
तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**(दोन) खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून निवडीने ( २० टक्के पदे )**

१)बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामधील कनिष्ठ अभियंता पदाच्या निम्न/समकक्ष वेतनश्रेणीतील सर्व पूर्णवेळ नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेतील नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परीक्षेनंतर ३ वर्षाची स्थापत्य वा कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग मधील पदविका संपादित केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी खात्यांतर्गत निवडीने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/ विद्यापिठामधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

(दोन) उपरोक्त अनु क्र.१ मध्ये नमूद अर्हतांशी समकक्ष अर्हता असल्यास उमेदवाराने खाजगी स्वायत्त महाविद्यालयातून प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

२) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाचा वेळोवेळी संगणक हाताळणी /वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना मूळ पदावर प्रत्यावर्तित करण्यात येईल

- **टिप - सदर संवर्गातील पदे खालीलप्रमाणे भरण्यात येतील.**

१) ८० टक्के पदे थेट सरळसेवेने भरण्यात येतील.

२) २० टक्के पदे ज्यांनी महानगरपालिकेच्या सेवेत असताना / सेवेत येण्यापूर्वी वरील सरळसेवेतील (एक) मधील (२) (एक) (दोन) मधील अर्हता प्राप्त केली आहे व महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामधील कनिष्ठ अभियंता पदाच्या निम्न/समकक्ष वेतनश्रेणीतील सर्व पूर्णवेळ नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेत नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून भरण्यात येतील.

तसेच जेव्हा २० टक्के कोटयातील खात्यांतर्गत कर्मचारी नियुक्तीसाठी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहिलेली पदे सरळसेवा भरतीने भरण्यात येतील.

- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) हे पद 'ब' गटात वर्गीकृत केले असल्याने अनुकंपा/वारसाहक्क तत्वाने नियुक्ती द्यावयाच्या पदांमध्ये सदर पदांचा समावेश करता येणार नाही.

सही/-८.०३.२०२३
**नगर अभियंता**

सही/-२०.०३.२०२३
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**

सही/- २४.०३.२०२३
**संचालक (अ.से.व प्र)**

सही/-२८.०३.२०२३
**सह आयुक्त (साप्र)**

सही/- ३१.०३.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)**

सही/- १८.०४.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)**

## बृहन्मुंबई महानगरपालिका

## मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि.१८.०४.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/४३९२/डी अन्वये मंजूरी दिलेल्या कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदाच्या सुधारीत अर्हता.

**(एक) सरळसेवेने** ( ८० टक्के पदे सरळसेवेने)
बाहेरुन थेट सरळसेवेने जे उमेदवार खालीलप्रमाणे किमान पात्रता धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षापेक्षा व मागासवर्गीय उमेदवारांचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही. तसेच वयाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका/शासनाने वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

२)उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परीक्षेनंतर ३ वर्षांची यांत्रिकी विद्युत /ऑटोमोबाईल/इलेक्ट्रॉनिक्स/प्रॉडक्शन इंजिनिअरींगमधील पदविका किंवा डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम/डिप्लोमा इन इंडस्ट्रीअल इलेक्ट्रॉनिक्स/डिप्लोमा प्रोग्रॅम इन इन्स्ट्रयुमेंटेशन/डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग संपादित केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थाना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापीठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.
(दोन) उपरोक्त अनु क्र.२ मध्ये नमूद अर्हतांशी समकक्ष अर्हता असल्यास उमेदवाराने खाजगी स्वायत्त महाविद्यालयातून प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

३) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल..

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाचा वेळोवेळी संगणक हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.
तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**(दोन) खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून निवडीने ( २० टक्के पदे )**

१) बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामधील कनिष्ठ अभियंता पदाच्या निम्न/समकक्ष वेतनश्रेणीतील सर्व पूर्णवेळ नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परीक्षेनंतर ३ वर्षाची यांत्रिकी विद्युत / ऑटोमोबाईल/ इलेक्ट्रॉनिक्स/ प्रॉडक्शन इंजिनिअरींगमधील पदविका किंवा डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम/डिप्लोमा इन इंडस्ट्रीअल इलेक्ट्रॉनिक्स/डिप्लोमा प्रोग्रॅम इन इन्स्ट्रयुमेंटेशन/डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग संपादीत केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी खात्यांतर्गत निवडीने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थाना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापीठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.
(दोन) उपरोक्त अनु क्र.१ मध्ये नमूद अर्हतांशी समकक्ष अर्हता असल्यास उमेदवाराने खाजगी स्वायत्त महाविद्यालयातून प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

२) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.
अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाचा वेळोवेळी संगणक हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना मूळ पदावर प्रत्यावर्तित करण्यात येईल

टिप- सदर संवर्गातील पदे खालीलप्रमाणे भरण्यात येतील.

१) ८० टक्के पदे थेट सरळसेवेने भरण्यात येतील.

२) २० टक्के पदे ज्यांनी महानगरपालिकेच्या सेवेत असताना / सेवेत येण्यापूर्वी वरील सरळसेवेतील (एक) मधील (२) (एक) (दोन) मधील अर्हता प्राप्त केली आहे व महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील खात्यामधील कनिष्ठ अभियंता पदाच्या निम्न/समकक्ष वेतनश्रेणीतील सर्व पूर्णवेळ नियमित तत्वावर कार्यरत असणा-या व ज्यांची महानगरपालिकेत नियमित तत्वावरील सेवा २ वर्षापेक्षा कमी नाही अशा खात्यांतर्गत कर्मचा-यांमधून भरण्यात येतील.

तसेच जेव्हा २० टक्के कोटयातील खात्यांतर्गत कर्मचारी नियुक्तीसाठी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहिलेली पदे सरळसेवा भरतीने भरण्यात येतील.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) हे पद 'ब' गटात वर्गीकृत केले असल्याने अनुकंपा/वारसाहक्क तत्वाने नियुक्ती द्यावयाच्या पदांमध्ये सदर पदांचा समावेश करता येणार नाही.

सही/-८.०३.२०२३
**नगर अभियंता**

सही/-२०.०३.२०२३
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**

सही/- २४.०३.२०२३
**संचालक (अ.से.व प्र)**

सही/-२८.०३.२०२३
**सह आयुक्त (साप्र)**

सही/- ३१.०३.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)**

सही/- १८.०४.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)**